आळंबी उद्योग

सक्षमीकरणाचा सामूहिक प्रयत्न

S. Maurya, P. R. Kumar, R. S. Pan and K. Singh, Bikas Das and C. P. Bhatt

ही कथा आहे एका आदिवासी समुदायाची. त्रासदायक जीवन ते भरभराटीचे जीवन अशा परिवर्तनाची. निराधारपणापासून आर्थिक सक्षमतेच्या प्रवासाची. ज्ञान एक शक्ती व सामूहिक कृती एक सामर्थ्य या बळावर या आदिवासी महिलांनी भरभराटी व सबलीकरणाकडे जाणारा स्वत:चा मार्ग बनविला.

दुमका जिल्ह्यातील दुमका व जामा तालुक्यातील दुर्गम भागातील ८ गावातील आदिवासी लोक उपजीविकेसाठी पिके व इतर छोट्या-मोठ्या उद्योगावर अवलंबून रहात होते. सखल भागात तांदुळाचे उत्पादन प्रामुख्याने खाण्यासाठी वापरले जाई व काही प्रमाणात प्रक्रिया करून हन्नीया (स्थानिक दारू) नावाचे पेय तयार केले जात असे. मूग, उडीद, चवळी, हरभरा यासारखी कडधान्ये तसेच तीळ, सरसो, कला तील यासारख्या काटक तेलबिया यांचे देखील नैसर्गिक पद्धतीने धनाच्या किंवा भाजी पाल्याच्या पिकासोबत उत्पादन ते घेत असत. अशी पारंपारिक शेती पद्धतीमुळे त्यांच्या आहारामध्ये पोषक तत्त्वे सामावलेली असत. भाज्या व जंगलातून जमा केलेली महुआ फुले व लाख विकून ते त्याचा पैसा करीत. तेंडूची पाने, महुआ व पळसाची पाने यांच्या पत्रावळी बनवून विकणे हा त्यांचा पैसे मिळवण्याचा धंदा होता.

स्थानिक समूह पारंपारिक तांदुळाचे उत्पादन घेत असे व त्यासोबत विविध प्रकारच्या भाज्या (भोपळा, भोपळावर्गीय भाज्या, घोसाळी, दोडके,) यांचेही उत्पादन घेतले जात असे. हा भाग तसा दुर्गम असल्याने समाजातील इतर घटकांचा तसा प्रभाव नव्हता आणि त्यामुळेच येथील लोक त्यांच्या परंपरागत पद्धतीनेच पिकांचे उत्पादन घेत होते. २००९-१० मध्ये National Agricultural Innovation Project (NAIP) मार्फत स्थानिक लोकांची उपजीविका सुधारण्यासाठी शेती आधारित काही प्रयोग सुरू केले.

ग्रामसभेच्या माध्यमातून शेतकऱ्यांशी परिचय करून घेतला. सुरुवातीलाच असे लक्षात आले की शेतकरी भाजी पाल्यासाठी नर्सरी बनवत नाहीत. त्या ऐवजी सरळ बिया पेरून ते पिके घेत होते. पावसाळ्यातच ह्या भाज्या पिकवल्या जात असल्यामुळे एक तर ठराविक हंगामामध्येच सर्व भाज्या तयार व्हायच्या. शिवाय पावसाच्या जोरामुळे,

मशरूमचे सामूहिक उत्पादन व विक्री



बुरशीजन्य रोगाची लागण झाल्यामुळे व काही वेळा पाऊस न पडल्याने नाजूक रोपांचे नुकसान व्हायचे. एकाच ठराविक हंगामात सर्व भाज्या विक्रीला उपलब्ध असल्यामुळे विक्रीची किंमत खूपच कमी येत असे. शिवाय लोकांना बिगर हंगामी पिके व नर्सरीबद्दल फारसे माहिती नव्हते. म्हणून प्रशिक्षणाच्या हेतूने प्रत्येक गावात एक नर्सरी बनवली गेली. गावातील सर्वच शेतकरी प्रशिक्षणात व नर्सरी बांधण्यात सहभागी झाले. सर्वांनी मिळून नर्सरी उभारणे हा त्या लोकांचा पहिला गट शेतीचा प्रयोग होता. मोठ्या प्रमाणात नर्सरी उभारणे व सांभाळणेच्या अनुभवासोबतच त्यांच्या शेतात लावण्यासाठी विविध भाज्यांची व इतर पिकांची रोपे देखील उपलब्ध झाली. या नवीन पद्धतीमुळे शेतकऱ्यांना बिगर हंगामात पिके घेण्याची उत्सुकता झाली व त्यांनी तशी सुरुवात पण केली.

सगबेहरी गावात लिलमुनी सोरेनच्या मार्गदर्शनाखाली ९ महिलांनी ऑयस्टर मशरूमचे उत्पादन घेतले. ५०० चौरस फूट जागा असलेल्या मांडवात मशरुमचे उत्पादन घेता येते. पहिली लागवड मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात यशस्वीपणे केली व त्यानंतर सप्टेंबरपर्यंत प्रत्येक २० दिवसांनी नवीन बॅचची लागवड केली गेली. प्रत्येक बॅच ४० दिवसानंतर काढणीसाठी तयार होते. प्रत्येकी ६०० बॅगनुसार एकूण १० बॅगचे उत्पादन घेतले गेले. एका बॅचमध्ये साधारणतः ४०० किलो उत्पादन मिळाले. १४० रुपये प्रती किलो दराने एक बॅचच्या उत्पादनातून सुमारे ६३००० रुपये उत्पन्न मिळाले. प्रती बॅच ६०० बॅगनुसार लागत खर्च २५५०० रुपये येतो. यामध्ये इतर निविष्ठाचा (जागेचे भाडे, गटाच्या सदस्यांनी घेतलेली मेहनत, मजुरी आणि बीज) इ. खर्च धरलेला आहे. याचा अर्थ एका बॅचचा निव्वळ नफा ३७५०० रुपयेपर्यंत जातो. या सामूहिक उपक्रमामध्ये प्रत्येक महिला प्रतिनिधीला ४१६७ रुपये मिळतात. यापैकी ४०% रक्कम गटाच्या बचतीमध्ये जमा होते. आता लिलमुनी सोरेनला आता स्थानिक प्रशिक्षक म्हणून ओळखले जात आहे. संथाली बोली भाषेत ती इतर महिलांना प्रशिक्षण देत असते. प्रशिक्षण देऊन ती दरमहा ४०० रुपये कमावत आहे.

भाताचे पीक घेतल्यानंतर टोमेटो, वांगी, मिरची व काकडीवर्गीय भाज्यांची रोपे बनवायला शेतकरी शिकले. बिगर हंगामामध्ये प्लास्टिक चे ट्रे अथवा पोलिटनेल मध्ये रोपे बनवू लागले. रोपे आजूबाजूच्या शेतकऱ्यांना विकू लागले. हा त्यांचा अगदी पहिला व्यावसायिक उपक्रम ठरला. थोडासा छोटा का असेना पण तो उत्साह वाढवणारा अनुभव ठरला. अशा प्रकारे वाढीव उत्पादन झाल्यामुळे शेतकरी पुढील प्रक्रियेसाठी तयार झाले.

मशरूम उत्पादन

अन्न म्हणून खाण्यायोग्य जंगलामध्ये उगवणारी मशरूम लोकांना माहीत होते. अशी मशरूम ते जंगलातून गोळा करून आपल्या आहारात घेत असत. जास्त असतील तर आजूबाजूच्या आठवडी बाजारात (गुहीयाजोरी, दुमका, बडा पलानी व केरेल बाजार) ते ८० ते १०० रुपये किलो भावाने विकत असत. पण मशरूमची शेती करणे त्यांना नवीन होते. NAIP च्या पाठिंब्यामुळे मशरूम शेती करण्याचे कौशल्य आत्मसात केले आणि तशी पहिल्यांदाच आपापल्या घरात मशरूम पिकवण्याचा प्रयत्न केला. अगदी पहिल्या प्रयत्नातच निर्माण झालेल्या मशरूमला शेजारच्या तालुका बाजारात (दुमका, गुहीयाजोरी आणि जमतारा) चांगली मागणी आली. यावेळी मशरूम १२० ते १४० रुपये किलो या भावाने विकली गेली. शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढला आणि हा व्यवसाय अजून वाढवायचा असे त्यांनी ठरवले. अशा पद्धतीने १० गावातील सुमारे ७०० ते ८०० महिला शेतकऱ्यांना प्रशिक्षण दिले गेले. एकेक दिवसाची प्रशिक्षणे प्रत्येक गावामध्ये घेतली. प्रशिक्षणानंतर लगेच (२००९-१०) गावात साधारणतः १० ते २०० महिलांनी मशरुमची लागवड केली. पहिल्या हंगामानंतर फक्त ५० महिलांनी मशरूम लागवड चालू ठेवली पण इतर महिलांची शेत कमी असल्याने व लागतीसाठी लागणारे वस्तू सहज उपलब्ध नसल्याने त्यांनी मशरूम लागवड बंद केली. एरवी भात पिकाची काढणी झाल्यानंतर ही कुटुंबे रोजगाराच्या शोधात स्थलांतर करतात. सुमारे २०-२५ कुटुंबे रोजगाराच्या शोधात बाहेरगावी न जाता गावातच राहण्यासाठी तयार झाले व त्यांना मशरूम लागवडीसाठी प्रकल्पातून सहाय्य दिले गेले. सुरुवातीला या महिलांनी स्वतंत्र आपल्या घरामध्ये उत्पादन घेतले व विक्रीसुद्धा स्वतंत्रपणेच केली. मग एक दोन उत्पादन साखळीनंतर उत्पादन जरी स्वतंत्र घेतले तरी विक्री मात्र एकत्रच करू लागले.

सामूहिक उपक्रमाकडे

सन २०११ पासून मात्र मशरूम लागवड एकत्र सामूहिक पद्धतीने करण्याचे ठरवले. सर्वांनी आपापले संसाधने जमा केली आणि व्यावसायिक दृष्टिकोनातून मशरूम उत्पादन करण्याचे ठरले. एकत्रित उद्योग केल्याने मशरूमचे थर बनवणे, अळंबी अंडी खरेदी करणे, थर व्यवस्थित राखण्यासाठी पुरेशी जागा बनवणे, बाजारापर्यंत माल घेऊन जाणे व तेथे माल नीट लावणे इ. खर्चात कपात होऊ शकते असे सर्वांना वाटले. सामूहिक उद्योगामुळे साधनसामुग्री व मजुरीवरचा खर्च देखील कमी येऊ लागला. ग्रोथ चेंबर प्रत्येकाने न बनवता सर्वांसाठी एकच चेंबर वापरता येऊ लागला. तसेच साठवणूक व बॅग भरण्यासाठी वेगवेगळी जागा असण्याची गरज नाही. त्यामुळे जागा व लागणारे इतर भांडवल व मजुरी वाचली. अशा पद्धतीने एकंदरीत सामूहिक मशरूम उत्पादन प्रणालीमुळे संचालनासाठी लागणारा खर्च कमी झाला.

स्वतःहून आपल्या लहान (४-५ सदस्य) गटामध्ये किंवा मोठ्या (१६-२० सदस्य) गटामध्ये एकत्र येऊन मशरूमचे उत्पादन घेणे व विक्री करणे सुरू केले. अगदी पहिला बचत गट NAIP च्या सपोर्टनी तयार केला

होता. नंतर असे अनेक गट त्यांनी स्वत:हून बनवले व उपक्रम राबवला. प्रत्येक सदस्य वाटून घेतलेली कामे करीत आहेत. स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेले भाताचे तानस वापरून थर बनवणे, बाजारात घेऊन जाणे, विक्री करणे अशी विविध कामांचे गटातील सदस्यांमध्ये वाटप केलेल आहेत. एकंदर गटाचे उत्तम व्यवस्थापन या बाबतीत देखील प्रशिक्षण दिले गेले.

NAIP कार्यक्रमांतर्गत या गटाना सतत मदत मिळाली. अळंबी अंडी पुरवठा, बुरशी नाशके, बेक्टेरीया नाशके तसेच माल ठेवण्यासाठी वापरायच्या प्लास्टिक पिशव्या अशा प्रकारच्या निविष्टाचा पुरवठा केला गेला. गरजेनुसार कॅल्शियम कॅर्बोनेटचा पुरवठा देखील केला गेला. हा उद्योग कुडाच्या व मातीच्या मांडवामध्ये केला जात होता म्हणून NAIP ने वरून झाकून घेण्यासाठी मोठे प्लास्टिक शीट देखील दिले होते.

पाच सदस्यांच्या गटाचे सरासरी उत्पादन ४० किलो इतके होते. त्यापैकी २० ते २५ टक्के कुटुंबाच्या वापरासाठी ठेऊन बाकी सर्व विक्री केले जाते. घरी वापरण्यात आलेल्या मालाच्या नोंदी प्रत्येकाच्या रजिस्टरमध्ये ठेऊन तेवढया मालाची रक्कम त्या कुटुंबाच्या लाभांशमधून कमी केला जातो. दरवर्षी घरातील भोजनामध्ये आळंबीचा वाटा १६ किलोवरून ३६ किलो इतका वाढला. पूर्वी हे लोक मशरूम आपल्या आहारात घेत होते. पण ते जंगलातून गोळा करून आणले जात होते तेही केवळ पावसाळ्यातच. पण आता आळंबीचे खास उत्पादन घेतले जात असल्यामुळे वर्षातील बरेच दिवस मशरूम त्यांच्या आहारात असते.

स्वतंत्रपणे शेतकरी आपापला माल विकत होते तेव्हा त्यांना स्थानिक बाजारच उपलब्ध होता आणि म्हणून त्यांना दर देखील कमी मिळायचा (१०० ते १२० रुपये प्रती किलो). शिवाय प्रत्येकाचा वाहतूक खर्च, माल भरून ठेवण्याच्या पिशव्या, मजुरी व देखभाल इ.चा खर्च वाढीव असायचा. पण सर्वांचा माल एकत्र करून त्यांना मोठ्या शहरात (दुमका, जमतारा, साहेबगंज) विक्रीसाठी घेऊन गेल्यामुळे भाव जास्त (१४० ते १६० रुपये प्रती किलो) मिळू लागला. या शिवाय सुमारे ८०% खर्च वाचू लागला. २०१०-११ मध्ये गटाने १,४०,००० रुपये मशरूम विकून मिळवले. विक्री करून आलेले पैसे गटाच्या बँक खात्यात जमा होतात व फिरते भांडवल म्हणून वापरतात. सदस्यांना गरजेच्या वेळी कर्ज देखील दिले जाते. सध्या गट १०० आळंबी अंडी पाकिटे घेतात. यामध्ये ३०० केसेस दरमहा तयार होतात. बाजारभाव सतत वाढतच असल्याने गटाला बऱ्यापैकी पैसा मिळत आहे. सरासरी महिन्याला ३०००० रुपये गटाला मिळतात.

मशरूम उत्पादन एक उद्योग म्हणून उभा राहिल्यामुळे आदिवासींच्या कुटुंबात पोषक आहाराची हमी निर्माण झाली, बऱ्यापैकी रोजगार उपलब्ध झाला, कुटुंबाचे उत्पन्न वाढले आणि बाहेरगावी रोजगारासाठी जाणे थांबले.

शाश्वत उपक्रमाकडे वाटचाल

मशरूम उत्पादन एक उद्योग म्हणून उभा राहिल्यामुळे आदिवासींच्या कुटुंबात पोषक आहाराची हमी निर्माण झाली, बऱ्यापैकी रोजगार उपलब्ध झाला, कुटुंबाचे उत्पन्न वाढले आणि रोजगारासाठी बाहेरगावी स्थलांतर थांबले. सामूहिक उत्पादन व विक्री यामुळे आदिवासी लोकांना बरेच फायदे मिळाल्याचा अनुभव आला. यामध्ये सर्वांचाच विजय झाला हे अधोरेखित झाले.

या प्रक्रियेमध्ये NAIP प्रकल्पाचा मोठा वाटा राहिला. महिलांना प्रोत्साहित करणे, त्यांच्या अभ्यास भेटी घडवून आणणे, त्यांच्यासाठी प्रात्याक्षिके करणे, प्रशिक्षणे आयोजित करणे, गरजेनुसार सतत मदत, सहयोग करणे व त्यांच्या पाठीशी राहणे NAIP ने सातत्याने केले आहे. NAIP प्रकल्प २०११ ला बंद केल्यानंतर सुद्धा NAIP ने हा सहयोग २०१४-१५ पर्यंत सुरू ठेवला होता. काही अत्यावश्यक मदत तर २०१६-१७ पर्यंत दिल्या. परंतु आता उत्पादन प्रक्रिया आत्मनिर्भर झाली आहे. चांगली मिळकत झाल्यामुळे गटांनी त्यांचे कामकाज सुधारले. व्यवसायासाठीची साधनसामुग्री, जागा, शेड, साठवणुकीची व्यवस्था, चेम्बर्स या सर्वांमध्ये सुधारणा केल्या. भाताचे तानस बारीक करण्यासाठी गटांनी कडबा कातर विकत घेतले. १० गांवामध्ये असे १० कडबा कातर आहेत.

वैयक्तिक छोटे व घरगुती उत्पादन व विक्रीची सुरुवात करून आता ह्याच महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून सामूहिक उद्योग निर्माण केले आहेत.यामुळे त्यांचे राहणीमान सुद्धा सुधारले. काहींनी आपल्या घरावर सिमेंटचे छत टाकले तर काहींनी घरात टेलीव्हिजन घेतले ही एक प्रकारचे समृद्धीची उदाहरणे आहेत.

Priya Ranjan Kumar
Principle Scientist (plant breeding)
ICAR-RCER Research Center
PO : Rajaulatu Plandu,
Ranchi 834010 Jharkhand.
Email: ourprk@gmail.com

मराठी अनुवाद : दत्ता पाटील

Source :Mashroom enterprise- A Collective effort towards empowerment–LEISA IndiaSeptember 2018.